**सन १९५१ चा महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१)**

क्र.२०१९/डीसीबी/२/प्र.क्र.१/आरआर/१५२७

ज्याअर्थी, पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण यांनी त्यांचेकडिल पत्र क्र. जिविशा/प्रशासन/२०१९-४४७३, दि. १८/०२/२०१९ अन्वये सोलापूर ग्रामीण जिल्हयाच्या हद्दीत शांतता व सुरक्षितता राखणेसाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ३७ (१) अ ते फ चे आदेश लागू करणे निकडीचे असलेचे माझे निदर्शनास आणून दिले आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) अ ते फ च्या आदेशाचा अंमल दिनांक- १९/०२/२०१९ रोजी रात्री २०.०० वा संपुष्टात येत आहे.

आणि ज्याअर्थी, सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, तसेच समाजकंटक व गुंडप्रवृत्ती इसमांवर प्रतिबंधक कारवाई करणे सोईचे जावे यासाठी सोलापूर ग्रामीण जिल्ह्याचे हद्दीत दिनांक- १९/०२/२०१९ रोजीचे सकाळी ०८.०० वाजलेपासून पुढे १५ दिवस महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) चे आदेश लागू करणेस गरजेचे असलेचे माझे मत बनले आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (अ ते फ) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन मी संजय तेली, अपर जिल्हादंडाधिकारी सोलापूर, सोलापूर ग्रामीण जिल्हयांचे हद्दीत (पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हद्द वगळून) खालीलप्रमाणे वर्तन करणे दिनांक- १९/०२/२०१९ रोजी सकाळी ०८.०० वाजले पासून ते दिनांक- ०५/०३/२०१९ रोजी रात्री २०.०० पर्यंत मनाई करीत आहे.

अ) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, सुरे, काठी किंवा झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरिता वापरता येईल अशी कोणतीही वस्तु बरोबर नेणे. आणणे दगड अगर तत्सम वस्तु, शस्त्रे हताळणे, अगर त्याचा फेकून मारण्यासाठी उपयोग करणे.

क) कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे.

ड) व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे.

ई) सार्वजनिक घोषणा करणे.

फ) असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळया जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल अशी सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करून त्याचा प्रसार करणे.

या हुकूमाचे खंड अ ते फ ज्या सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजावितांना उपरनिर्दीष्ठ वस्तु हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधिक्षक (ग्रा), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरिक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या परवानगीस लागू पडणार नाहीत.

हा आदेश सोलापूर ग्रामीण जिल्हयाचे हद्दीत (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) अंमलात राहील. सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE अपर जिल्हा दंडाधिकारी सोलापूर SOLAPUR

(संजय तेली)
अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर

स्थळ :- सोलापूर
दिनांक :- १८/०२/२०१९

प्रत :- मा. पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामिण यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्द करणेसाठी तसेच प्रसिध्द केले बाबतचा रिपोर्ट इकडिल कार्यालयाकडे पाठवावा.

प्रत :- मा. व्यवस्थापक, येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे. यांचेकडे राजपत्रात प्रसिध्द करणेसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर यांचेकडे दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेसाठी सस्नेह अग्रेषित. (वृत्तपत्रातील प्रसिध्द झालेली कात्रणे या शाखेत पाठविणेत यावीत.)

२/- व्यवस्थापक दैनिक संचार, केसरी, तरुणभारत, लोकमत, दिव्य मराठी, सकाळ यांचेकडे सदरचा आदेश हा आपल्या दैनिकात बातमी या सदरात प्रसिध्द करणेकामी रवाना.

प्रत :- उपविभागीय अधिकारी, सोलापूर/ क्र.२ / पंढरपूर / माढा / मंगळवेढा /माळशिरस विभाग अकलूज.

प्रत :- तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, उत्तर सोलापूर/ दक्षिण सोलापूर/ बार्शी/ अक्कलकोट/ माढा/ मोहोळ/करमाळा/ पंढरपूर/ सांगोला/ मंगळवेढा/ माळशिरस यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित

प्रत :- राष्ट्रीय सूचना-विज्ञान केंद्र (NIC), जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

२/- सदरचा आदेश दि. १९.०२.१९ ते ०५.०३.१९ पर्यंत वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिद्ध करावे.

## सन १९५१ चा महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७ (३)

क्र.२०१९/डीसीबी/२/प्र.क्र.१/आरआर/१५२८

ज्याअर्थी, पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण यांनी त्यांचेकडिल पत्र क्र. जिविशा/प्रशासन/२०१९-४४७४, दि. १८/०२/२०१९ अन्वये सोलापूर ग्रामीण जिल्हयाच्या हद्दीत शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, तसेच समाजकंटक व गुंडप्रवृत्ती इसमांवर प्रतिबंधक कारवाई करणे सोईचे जावे यासाठी दिनांक- १९/०२/२०१९ रोजी सकाळी ०८.०० वाजले पासून पुढे १५ दिवस महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(३) चे आदेश लागू करणे निकडीचे असलेचे माझे निदर्शनास आणून दिले आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (३) च्या आदेशाचा अंमल दिनांक- १९/०२/२०१९ रोजी रात्री २०.०० संपुष्टात येत आहे.

आणि ज्याअर्थी, सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, तसेच समाजकंटक व गुंडप्रवृत्ती इसमांवर प्रतिबंधक कारवाई करणे सोईचे जावे यासाठी सोलापूर ग्रामीण जिल्ह्याचे हद्दीत दिनांक- १९/०२/२०१९ रोजीचे सकाळी ०८.०० वाजलेपासून पुढे १५ दिवस महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (३) चे आदेश लागू करणेस गरजेचे असलेचे माझे मत बनले आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ३७ (३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन मी संजय तेली, अपर जिल्हादंडाधिकारी सोलापूर, सोलापूर ग्रामीण जिल्हयाच्या हद्दीत (पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हद्द वगळून) दिनांक- १९/०२/२०१९ रोजीचे सकाळी ०८.०० वाजले पासून ते दिनांक- ०५/०३/२०१९ रोजीच्या रात्री २०.०० पर्यंत पांच किंवा पांचाहून जास्त लोक एकत्र येण्यास बंदी घालत आहे.

हा हुकुम अत्यावश्यक सेवा, सरकारी कामकाज बजावणाऱ्या यंत्रणांना लागू होणार नाही. तसेच ज्या प्रकरणी जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधिक्षक (ग्रा), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरिक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी पूर्व परवानगी दिली आहे अशा यात्रास्थळे व तत्सम प्रकरणांपुरते लागू होणार नाही.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE SOLAPUR

(संजय तेली)
अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर

स्थळ :- सोलापूर
दिनांक :- १८/०२/२०१९

प्रत :- मा.पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामिण यांचेकडे १०० प्रतीसह पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्द करणेसाठी तसेच प्रसिध्द केले बाबतचा रिपोर्ट इकडिल कार्यालयाकडे पाठवावा.

प्रत :- मा. व्यवस्थापक,येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे. यांचेकडे राजपत्रात प्रसिध्द करणेसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर यांचेकडे दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेसाठी सस्नेह अग्रेषित.
(वृत्तपत्रातील प्रसिध्द झालेली कात्रणे या शाखेत पाठविणेत यावीत.)
२/- व्यवस्थापक, दैनिक संचार, केसरी, तरूणभारत, लोकमत, दिव्य मराठी, सकाळ यांचेकडे सदरचा आदेश हा आपल्या दैनिकात प्रसिध्द करावा.

प्रत :- उपविभागीय अधिकारी, सोलापूर/ क्र.२ / पंढरपूर / माढा / मंगळवेढा /माळशिरस विभाग अकलूज.

प्रत :- तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, उत्तर सोलापूर/ दक्षिण सोलापूर/ बार्शी/ अक्कलकोट/ माढा/मोहोळ/करमाळा/ पंढरपूर/ सांगोला/ मंगळवेढा/ माळशिरस यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.

प्रत :- राष्ट्रीय सूचना-विज्ञान केंद्र (NIC), जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
२/- सदरचा आदेश दि. १९.०२.१९ ते ०५.०३.१९ पर्यंत वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिद्ध करावे.